# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१.
Email: directorbarti@gmail.com
Website : https://barti.maharashtra.gov.in

## अनुसूचित जातीच्या युवक व युवतींसाठी बँक (IBPS), लिपिक वर्गीय पदांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व तयारीसाठी प्रशिक्षण संस्थाची नोंदणी (Empanelment) व निवड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे वतीने अनुसूचित जातीतील व्यक्तींना योग्य प्रमाणात लाभ पोहचविण्यासाठी त्यांचा शैक्षणिक असा सर्वांगीण विकास होण्यासाठी विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुसूचित जातीमधील युवक व युवतींसाठी बँक (IBPS), लिपिक वर्गीय पदांसाठी स्पर्धा परिक्षा पूर्व तयारीसाठी तीन महिने कालावधीचे प्रशिक्षण (कोंचिग) देण्याचा उपक्रम अशासकीय/खाजगी संस्थामार्फत राबणिण्यासाठी प्रशिक्षण संस्थाची नोंदणी (Empanelment) व निवड करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कोचिंग कार्यक्रम महाराष्ट्रातील खाली नमुद केलेल्या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी राबविण्यासाठी कोचिंग देणाऱ्या सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, नुसार पंजीबध्द असलेल्या संस्थांची नोंदणी (Empanelment) व निवड करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्धा | भंडारा | बीड | हिंगोली | औरंगाबाद |
| मुंबई उपनगर | सिंधुदूर्ग | रत्नागिरी | पालघर | |

१) निविदा फॉर्म व निविदेच्या अटी व शर्ती, बार्टी, पुणे कार्यालयामध्ये शासकीय कामकाजा दिवशी दिनांक २८/०३/२०१६ ते १८/०४/२०१६ पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होऊ शकेल किंवा संस्थेच्या Website : https://barti.maharashtra.gov.in > Notice Board > Sanstha Empanelment > Feb 2016 या वेब साईटवरुन डाऊनलोड करता येईल.

२) निविदा फॉर्मची किंमत रु. २०००/– ठेवण्यात आली आहे. वेबसाईटवरुन निविदा फॉर्म डाऊनलोड केल्यास तांत्रिक कागद पत्राबरोबर रु. २०००/– धनाकर्ष जोडणे बंधनकारक राहील. किंवा कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टया वगळून) रु. २०००/– रोख रक्कम भरल्यास निविदा फॉर्म उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) बार्टी, पुणे या कार्यालयात निविदा पोहोचण्याची अंतिम मुदत दिनांक. १८/०४/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर येणाऱ्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत.

४) निविदा दिनांक १८/०४/२०१६ सायंकाळी ४.०० वाजता उघडण्यात येतील.

५) निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६) निविदा पोष्टाद्वारे मुदतीनंतर प्राप्त झाल्यास अशा निविदेचा विचार करण्यात येणार नाही. त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

७) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचा हक्क महासंचालक, बार्टी, पुणे यांनी राखून ठेवला आहे

## अर्ज करण्याची अंतिम तारीख - १८ एप्रिल, २०१६

**पाहत रहा**– https://barti.maharashtra.gov.in>Notice Board>Sanstha Empanelment>April.2016

**Advt/IBPS/22/03/2016/405**

**महासंचालक, बार्टी**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

**२८, क्वीन्स् गार्डन, कॅम्प, पुणे- ४११ ००१.**

**Website :** http//:barti.maharashtra.gov.in **ई-मेलः-** **directorbarti@gmail.com**

---

## अटी व शर्ती

शासनाच्या अनुसूचित जाती विषयक कल्याणकारी धोरणांचा अनुसूचित जातीतील व्यक्तींना योग्य प्रमाणात लाभ पोहचविण्यासाठी त्याच्या शैक्षाणिक विकास होण्यासाठी शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येतात. अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता स्पर्धात्मक परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्हयांमध्ये स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्यास खालील विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाने मान्यता दिली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या कडून अनुसूचित जातीच्या युवक व युवतींसाठी बँक, रेल्वे व एल.आय.सी. इ. लिपिक वर्गीय पदांच्या स्पर्धा परिक्षेची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी चार महिने कालावधीचे प्रशिक्षण (कोचिंग) देण्याचा उपक्रम अशासकीय / खाजगी संस्थामार्फत राबविण्यात येणार आहे.

अशासकीय / खाजगी संस्थांची नोंदणी व निवड करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयात जाहिरात दिलेली आहे.

### प्रशिक्षण संस्थांची नोंदणी व निवडीसाठी पात्रताः-

१. प्रशिक्षण संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम नुसार पंजीबंध असावी.
२. प्रशिक्षण संस्थेकडे आवश्यक प्रमाणात पूर्णकालिक किंवा अंशकालिक अनुभवी तज्ञ प्रशिक्षक वर्ग असणे आवश्यक आहे.
३. ३ महिने कालावधीसाठी प्रशिक्षण केंद्रावर ५० विद्यार्थ्यांच्या एका बॅचेस ला प्रशिक्षण देण्यात येईल.
४. प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणासाठी असणारी जागा स्वत:च्या मालकीची / भाडयाची असणे बंधनकारक राहिल.
५. प्रशिक्षण संस्थेचा अनुभव तसेच संस्थेत प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांचे / व्याख्याते यांचे शैक्षाणिक अर्हता व अनुभव इ. बाबत योग्य तो निकष मा. महासंचालक, बार्टी, हे ठरवतील व त्यांचा निर्णय अंतिम राहिल.
६. प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणासाठी वर्ग / खोल्या, (विद्यार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्था फर्निचरसह), प्रशिक्षण साहित्य, ग्रंथालय, वाचनालय, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, विजेची सोय व प्रशिक्षण केंद्रामध्ये पुरेशी हवा येण्यासाठी इमारीला दारे-खिडक्या स्वत:च्या मालकीचे / भाडयाच्या इमारतीमध्ये असणे आवश्यक आहे.

७. प्रशिक्षण केंद्राच्या इमारतींच्या देखभाल व दुरुस्ती खर्च प्रशिक्षण संस्थेने करावयाचा आहे.

८. कोचिंगमध्ये समाविष्ट करावयाचे विषय:-

| अ.क्र | विषय |
|---|---|
| १ | Reasoning |
| २ | Numerical Ability |
| ३ | GeneralAwareness |
| ४ | English Language |
| ५ | Computer Knowledge |

९. प्रशिक्षण केंद्र चालक संस्थेने दररोज विद्यार्थ्यांची/व्याख्याते यांची उपस्थिती बायोमॅट्रीक मशिनवर नोंद ठेवणे आवश्यक आहे.

१०. ज्या संस्थेचे / फर्मचे नाव काळया यादीत आहे त्या किंवा त्याच्या कोणत्याही नातेवाईकास काम देण्यात येणार नाही.

११. नोंदणी व निवड केलेल्या संस्थेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या बरोबर लेखी करार करावा लागेल.

## ब) अर्जाचा नमुना:-

१) संबंधित संस्थेने प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांचे नावे, पत्ते व त्यांचे फोटो सोबत सादर करणे आवश्यक आहे.

२) प्रशिक्षण देणाऱ्या तज्ञ व्यक्तींची / व्याख्याते यांची यादी बायोडेटासह अर्जासोबत जोडावी लागेल.

३) प्रशिक्षण केंद्र जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सुरु करावयाचे आहे.मुख्यालयाचे नाव संस्थेने निवेदेमध्ये स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे.

४) प्रशिक्षण केंद्र चालु करण्याकरिता उपलब्ध वर्ग खोल्यांची संख्या, त्यांचा आकार यांची माहिती व मंजुर नकाशा अर्ज निविदे सोबत जोडावे लागेल.

५) निविदाधारकाने त्यांचा अर्ज भरुन पाकीटावर "**स्पर्धा परिक्षा कोचिंग केंद्रासाठी**" अर्ज असे ठळक अक्षरात लिहून खालीलप्रमाणे अर्ज सादर करावा. यामध्ये अर्ज फॉर्म अ व त्यासोबत आवश्यक ती प्रमाणपत्रे / कागदपत्रे जोडावीत.

६) अर्ज स्वीकारण्याचे, उघडण्याच्या तारखेमध्ये, वेळेमध्ये बदल करण्याचे तसेच कोणताही अर्ज कोणतेही कारण न दाखविता अंशत: किंवा पूर्णत: मंजूर करण्याचे अधिकार किंवा नामंजूर करण्याचे अधिकार महासंचालक, बार्टी यांनी राखून ठेवले आहेत.

७) अर्जातील प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे.

८) या संस्थेतर्फे प्रशिक्षण केंद्रास आदेश देण्यापूर्वी महासंचालक, बार्टी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी संबंधित संस्थेस भेट देऊन त्यांनी अर्जामध्ये नमुद केलेली माहिती बरोबर व वस्तुनिष्ठ असल्याची खात्री करतील आणि त्यांचा अहवाल समाधानकारक आल्यानंतरच व इतर बाबी योग्य असल्यास संस्थेची नोंदणी केली जाईल.

## **क) प्रशिक्षण (Coaching) बाबत संक्षिप्त् ा माहिती:-**

१) प्रशिक्षण कार्यक्रमाची योजना प्रथम: ३ महिन्यासाठी असेल, त्यामध्ये प्रत्येक केंद्रामध्ये एक बॅच ५० विद्यार्थ्यांची राहील. अशा एका केंद्रास ३ महिन्यासाठी एक बॅच राहील, म्हणजेच एका केंद्रामध्ये ३ महिन्यासाठी सुमारे ५० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण द्यावे लागेल किंवा महासंचालक, बार्टी यांनी निर्धारित इतक्या उमेदवारांसाठी प्रशिक्षणाच्या बॅचेस व विद्यार्थ्यां संख्या वाढविण्याचे किंवा कमी करण्याचे अधिकार राहतील.

२) प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिन्यांचा असेल.

३) उपरोक्त परिच्छेदात [ब-(३)] नमुद केल्याप्रमाणे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येईल.

४) संस्थेचे मागील दोन वर्षाचे झालेले लेखापरिक्षण व सदर लेखा परिक्षण अहवालात गंभीर स्वरुपाचे आक्षेप नसावेत.(अर्जासोबत अहवाल जोडणे आवश्यक आहे.)

५) बँक, रेल्वे, एल.आय.सी व इतर तत्सम स्पर्धा परिक्षांकरिता पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागवुन त्यांची सामाईक प्रवेश परिक्षा घेऊन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार व विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार बार्टी, पुणे निवड करील. निवड प्रक्रियेमध्ये संस्थेचा सहभाग असेल. (तथापि यासाठी आवश्यक तो जाहिरातीचा खर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत केला जाईल.)

६) या संस्थेचे महासंचालक किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी वेळोवेळी पाहणी करतील व त्याबाबतचा अहवाल महासंचालक यांना सादर करतील.

७) संस्थेच्या कामावर सनियंत्रण ठेवणे, मुल्यमापन करणे व लेखापरिक्षणाबाबतची कार्यवाही करणे इ.बाबींचे अधिकार महासंचालक, बार्टी, पुणे यांचेकडे राहतील.

८) निविदाधारकाच्या संस्थेच्या अध्यायन केंद्रामध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास, संस्था अयोग्य आहे असे आढळल्यास संस्थेचे प्रशिक्षण केंद्र बंद करण्याचा अधिकार महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने राखुन ठेवला आहे.

९) उमेदवारांची निवड खालील निकषांच्या आधारे केली जाईल.

- सदरील प्रशिक्षण हे महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येईल.
- ३०% जागा अनुसूचित जातीच्या महिला उमेदवारासाठी राखीव असतील.
- शासकिय धोरणाप्रमाणे ३ % जागा अनुसूचित जातीच्या नि:समर्थ असलेल्या व्यक्ती (Person With Disability) (जुना प्रचलित शब्द अपंग व्यक्ती) साठी राखीव राहील.
- बँक (IBPS), रेल्वे, एल.आय.सी इ. लिपिक वर्गीय पदाच्या सेवाभरतीसाठी मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या लिपीक परिक्षांसाठी विहित केलेल्या इतर सर्व अर्हता उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे.
- या प्रशिक्षणाचा लाभ उमेदवारांना एकादच घेता येईल.
- या प्रशिक्षणाचा लाभ फक्त प्रशिक्षणापुरता असेल.

१०) परिस्थितीनुसार योग्य त्या नवीन अटी करारनाम्यामध्ये समाविष्ट करण्याचे अथवा त्यानंतर एखाद्या नियमात फेरफार करण्याचा अथवा पूर्णपणे वगळण्याचा संपूर्ण अधिकार महासंचालक बार्टी यांनी राखून ठेवला आहे.

११) अर्ज आणि त्याबाबतच्या अटी व नियम यांचा अर्थ लावण्याचा संपूर्ण अधिकार या कार्यालयास राहील आणि महासंचालक, बार्टी,पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.

**महासंचालक,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था, पुणे

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

**२८, क्वीन्स गार्डन, पुणे -४११ ००१.**

**Website :** http//:barti.maharashtra.gov.in **ई-मेल directorbarti@gmail.com**


---

## बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ. लिपीक वर्गीय स्पर्धा परिक्षेकरीता मार्गदर्शन (कोचिंग)करण्याकरीता संस्थांची नोंदणी (Empanelment) करण्याकरीता अर्ज

## अर्ज फॉर्म- अ

**(साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.)**

| अ.क्र | विषय | माहिती | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | निविदा भरणाऱ्या संस्थेचे संपूर्ण नांव | | |
| २ | निविदा भरणाऱ्या संस्थेचे संपूर्ण पत्ता | | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक | | |
| ४ | मोबाईल क्रमांक | | |
| ५ | ई-मेल आय डी | | |
| ६ | संस्थेचा नोंदणी क्रमांक, प्रमाणपत्रासह | | |
| ७ | संस्थेचा सेल्स टॅक्स नंबर/व्हॅट नंबर | | |
| ८ | संस्थेने मागील तीन वर्षात आयकर भरला आहे काय? असल्यास त्याबाबतचे आयकर विवरणपत्र सादर करावेत. | | |
| ९ | संस्थेचे खाते असलेल्या बँकेचे नाव व पत्ता (एका पेक्षा जास्त बँकात खाती असल्यास त्यांचाही तपशील द्यावा.) | | |
| १० | संस्थेने बँकांमध्ये काढलेल्या खात्यांचा प्रकार व त्यांचे क्रमांक (पासबुकाची / किमान सहा महिन्याच्या व्यवहाराची झेरॉक्स किंवा सहा महिन्यांचे स्टेटमेट जोडणे आवश्यक) मागील ३ वर्षाचा लेखापरीक्षणाचा अहवाल (Audit Report) जोडावा. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | संस्थेची बँक खाती कोणाच्या नावावर आहेत त्यांची नावे व पत्ते | | |
| १२ | संस्थेने बँकांकडुन कर्ज घेतले असल्यास त्या बँकांची नावे व कर्जाची रक्कम व कर्ज काढण्याचे कारण नमूद करावे. | | |
| १३ | संस्थेच्या नावाचे रु.५०,०००/- हजार एवढ्या रक्कमेचे राष्ट्रीकृत बँकचे नजीकच्या कालावधीचे हैसियत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. | | |
| १४ | अर्जासोबत विहित हमीपत्र सोबत जोडावे.<br>(हमीपत्र नमुना जोडला आहे) | | |
| १५ | संस्थेस बँक, रेल्वे, एल.आय.सी.इ. लिपीक वर्गीय भरतीपुर्व प्रशिक्षणाचा शक्यतो अनुभव असावा. | | |
| १६ | संस्थेमधील तज्ञ व्यक्तींची (Resource Person) संख्या व त्यांची नावे (त्यांचा बायोडेटा सोबत जोडणे आवश्यक) | | |
| १७ | अशा प्रकारच्या प्रशिक्षणाकरीता इतर ठिकाणी भाग घेतला असल्यास त्यासंबंधीची माहिती द्यावी. | | |
| १८ | प्रशिक्षण केंद्र ज्या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सुरु करणार आहे त्या ठिकाणाचे नाव, पत्ते व प्रशिक्षण केद्रांचा संपूर्ण पत्ता द्यावा. | | |
| १९ | इमारत भाड्याची आहे की, स्वत:ची(स्वत:ची असल्यास पुरावे जोडावे / भाड्याची असल्यास लिव्ह लायन्सस करारनामा जोडावा.) | | |
| २० | इमारतीमध्ये असलेल्या खोल्यांची संख्या व त्यांचे अंदाजे क्षेत्रफळ, इमारतीचा मंजुर नकाशा सोबत जोडावा. | | |
| २१ | वर्ग खोल्यांमध्ये वायुविजन प्रक्रिया होते काय? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | इमारतीमध्ये पुरेशी दारे, खिडक्या, विद्युत व्यवस्था, पंखे, फळा, खुर्च्या, टेबल इ. साहित्य सुस्थितीत आहे काय?(बाबनिहाय माहिती द्यावी) | | |
| २३ | महिला व पुरुषांकरीता स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय आहे काय? ?(बाबनिहाय माहिती द्यावी) | | |
| २४ | ग्रंथालयाची सुविधा आहे काय? | | |
| २५ | ग्रंथालयातील पुस्तकांची, मासिके, वर्तमान पत्रे यांची संख्या नमुद करावी. | | |
| २६ | इमारतीमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय आहे काय? ?(तपशीलवार माहिती द्यावी) | | |
| २७ | प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांव्यक्तिरिक्त अन्य कर्मचाऱ्यांची संख्या (त्यांची नावे व पदनामे सोबत स्वतंत्रपणे देणे आवश्यक) | | |
| २८ | प्रशिक्षण केंद्रामध्ये दूरदर्शन संच, संगणक, प्रोजेक्टर, झेरॉक्स, दृकश्राव्यमाध्यमे इ. सुविधाबाबतची माहिती द्यावी. | | |
| २९ | सध्या कोणत्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत त्यांची माहिती<br>(त्याची यादी सोबत जोडणे आवश्यक आहे.) | | |
| ३० | मागदर्शन केंद्रा व्यतिरिक्त इतर शैक्षणिक कार्यक्रमाबाबतची माहिती. | | |
| ३१ | मार्गदर्शन केंद्राचे फोटोग्राफस<br>(सोबत जोडणे आवश्यक आहे.) | | |
| ३२ | मार्गदर्शन केंद्राचे व्हिडीओ शुटिंग करुन पाच ते दहा मिनिटांची फिल्मची सी.डी.<br>(सोबत जोडणे आवश्यक आहे.) | | |

**स्थळ:-**

**दिनांक:-**

**अर्जदारांचे नांव:-**

**संस्थेचे नाव व शिक्का:-**

# <u>हमीपत्र</u>

मी श्री/श्रीमती………………………………………………………….. हुद्या (संस्थेतील पद नमुद करावे)………………………………………. असे हमीपत्र लिहुन देतो/देते की, या अर्जात नमुद करण्यात आलेली सर्व माहिती खरी व बरोबर आहे.तसेच अर्जासोबत जोडलेल्या अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

**दिनांक:-**

**वेळ:-**

**ठिकाण:-**

**अर्जदाराची सही**

**नांव:- श्री/श्रीमती**

**पत्ता:-**

**संस्थेचे नाव/शिक्का:-**